# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-३५/२०२५ दिनांक- २५/०१/२०२५

## प्रेस नोट

**टेम्पो व कपडे असा ४,७५,०००/- रुपये किंमतीचा माल चोरी करण्याऱ्या आरोपीस अटक करुन सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १९/०१/२०२५ रोजी रात्रौ २१.०० वा. ते ०८.१५ वा चे दरम्यान संध्या पॉवर लॉन्ड्री ॲन्ड ड्रायर्स कंपनी, खान कम्पाउंड, पेल्हार, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर येथे सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. रामबहादुर राजाराम गुप्ता, वय ४७ वर्षे, रा. डी १०५, गेट नं. १४, स्टोन नं. २, मोठा धोबीघाट, मुंबई यांचे कंपनीचा टाटा मोटर्स कंपनीचा टेम्पो क्रमांक एम एच ०१ सी. वी. ९४५१ व त्यामध्ये एकूण १७९ रेडीमेड शर्ट असे कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीच्या इरादयाने टेम्पो व शर्ट असा एकुण ४,७५,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे दिनांक २०/०१/२०२५ रोजी १९.४७ वा. गुन्हा रजि. क्र. I ३७/२०२५ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०३(२), ३०५(२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. वपोनिरी सो यांचे मार्गदर्शन सुचनांनुसार सीसीटीव्ही फुटेज तसेच व तांत्रिक माहीतीचे आधारे गुन्हयातील चोरीस गेलेल्या टेम्पोचा पाठलाग करुन शोध घेवून इसम नामे १) हुसेन बसारत उल्ला, वय २२ वर्षे, व्यवसाय चालक, रा. इम्रान आर्ट कंपनी, सुन्नी मस्जिदजवळ, हाजमी नगर, मालवणी ७, मालाड, मुंबई मुळगाव रा. पट्टी नरवर, पो- मुरतगंज, मसिपूर, थाना खोकराज, जि. कौशाम्बी, पुरा मुफती एड, उत्तरप्रदेश मोबा नं. ७०५४३२८२५१ यास मुंबई मालवणी येथील परीसरातुन ताब्यात घेवून त्याचेकडे कौशल्यपूर्वक तपास करुन गुन्हयातील चोरीस गेलेला टेम्पो व कपडे असा ४,७५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर इसमास अटक करुन मा. न्यायालयात हजर करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, विरार, मा. श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे मा.श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्रीमती. दुर्गा चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/रमेश वाघचौरे, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, वसिम शेख, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----oooo----